पर्यावरण अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांवर छाननी शुल्क आकारण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

पर्यावरण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१३/प्र.क्र.१५१/तां.क.१,**

नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:-२ मे, २०१४

वाचा -केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाची अधिसूचना क्र.संकाआ-१५३३(अ), दि.१४.९.२००६.

**प्रस्तावना -**

पर्यावरण विभागाकडे पर्यावरण अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांची छाननी करणे, अशा प्राप्त प्रस्तावांची अद्ययावत यादी तयार करुन ती विभागाच्या संकेतस्थळावर ठेवणे, त्याचप्रमाणे SEAC समित्या आणि SEIAA प्राधिकरणाच्या बैठकांचे आयोजन करणे, या समित्यांच्या बैठकांची विषयसूची, बैठकांचे इतिवृत्त, शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे आदेश, सूचना तसेच, या कामासाठी नियुक्त करण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी यांचे मासिक वेतन इत्यादींचा आर्थिक भार शासनावर पडत आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन पर्यावरण विभागाकडे पर्यावरण अनुमतीसाठी प्राप्त होणा-या प्रस्तावांवर छाननी शुल्क आकारुन वरील सर्व बाबींसाठी होणारा खर्च भागविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. छाननी शुल्काबाबत केंद्र शासनाने दि.१३.४.२००० च्या पत्रान्वये पर्यावरण अनुमती/सागरी किनारा व्यवस्थापनांतर्गत अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांवर छाननी शुल्क लावण्याबाबत कळविले आहे. तसेच गुजरात व तामिळनाडू राज्यात CRZ/EIA अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांवर छाननी शुल्क लावण्यात येते.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९१४/१९९१ या प्रकरणी दिलेले दि.२८.८.१९९६ रोजीचे आदेश आणि भारतीय घटनेच्या कलम २१ अन्वये "पोल्युटर पे प्रिन्सीपल" हे तत्व हे देशातील पर्यावरण कायद्याचा अविभाज्य भाग असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार अशा प्रस्तावांवर छाननी शुल्क आकारणे समर्थनीय आहे.

४. केंद्र शासनाने पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत गठीत सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाकडे प्राप्त प्रस्तावांवर छाननी शुल्क आकारुन ते स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्याबाबत राजपत्रात नमूद केले आहे. त्याच कायद्यातील तरतूदींअंतर्गत SEIAA व SEAC-१, २, ३ चे गठन केले असल्याने आणि या

सर्व समित्या व प्राधिकरण हे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने सदरची तरतूद या प्राधिकरण व समित्यांनाही लागू होते.

## शासन निर्णय:-

वरील सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाने निर्गमित केलेल्या EIA Notification-२००६ अनुसार पर्यावरण अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांवर खालीलप्रमाणे छाननी शुल्क आकारण्यात यावे :-

| अ.क्र. | प्रकल्पाची एकूण किंमत | प्रस्तावित शुल्क |
|---|---|---|
| १ | रुपये १ कोटीपासून ते ५० कोटीपर्यंत | रु.१ लक्ष |
| २ | रुपये ५० कोटीपासून ते रुपये १०० कोटीपर्यंत | रु.३ लक्ष |
| ३ | रुपये १०० कोटीपासून ते ५०० कोटीपर्यंत | रु.५ लक्ष |
| ४ | रुपये ५०० कोटीपासून ते १००० कोटीपर्यंत | रु.१० लक्ष |
| ५ | रुपये १००० कोटीपासून व त्यावर | रु.१५ लक्ष |

२. पर्यावरण अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांवर छाननी शुल्क आकारुन जमा होणाऱ्या निधीतून खालीलप्रमाणे होणारा खर्च भागविण्याचे प्रस्तावित आहे :-

(१) SEAC समिती आणि SEIAA प्राधिकरणावरील अध्यक्ष, सदस्य यांना प्रतिदिन बैठक भत्ता खालीलप्रमाणे दिनांक १/१२/२०१३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने देण्याचे प्रस्तावित आहे:-

| अ.क्र. | पदनाम | प्रस्तावित बैठक भत्ता |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | रु.१५,०००/- प्रति दिन |
| २ | समितीचे सदस्य | रु.१०,०००/- प्रति दिन |

(२) प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमतीसाठी अर्ज सादर करतांना किंवा ज्यांना अद्याप पर्यावरण अनुमती पारित झालेली नाही त्यांनी चलनाद्वारे उपरोक्तप्रमाणे उघडल्या जाणाऱ्या खात्यामध्ये छाननी शुल्क जमा करुन त्या चलनाची मूळ प्रत अर्जासोबत सादर करावी. सध्या प्रकरण ज्या टप्प्यावर असेल त्या टप्प्यावर चलनाद्वारे छाननी शुल्क जमा केल्याचे चलन संबंधीतांकडे जमा करण्यात यावे. ज्या प्रकरणांमध्ये SEIAA च्या शिफारशीनंतर पर्यावरणीय अनुमती जारी झालेली नसेल त्यांनासुध्दा हा निर्णय लागू राहील व अशा प्रकरणांमध्ये चलन SEIAA कडे सादर करावे. SEAC व SEIAA ने जमा शुल्काची प्रकरण निहाय माहिती तयार करावी. याबाबत कार्यपध्दती स्वतंत्रपणे पर्यावरण विभागाद्वारे निश्चित करण्यात येईल.

---२ पैकी ---

(३) तसेच SEIAA व SEAC यांना सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सचिवालय म्हणून यापूर्वीच घोषित करण्यात आले आहे. छाननी शुल्काचा निधी जमा करण्यासाठी SEIAA/SEAC Secretariat या नांवाने राष्ट्रीयीकृत बँकेत बचत खाते उघडण्यात यावे. या खात्याची हाताळणी सध्या पुढील आदेश होईपर्यंत आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी SEIAA व SEAC यांच्या समन्वयाने व पर्यावरण विभागाच्या निदेशानुसार करावी. पर्यावरण विभागाने निर्देशित/मान्य केलेल्या बाबींवरच सदर खात्यातून खर्च करण्यात यावा. याबाबतचा तिमाही जमा/खर्चाचा लेखा मंडळ संचालक/प्रधान सचिव पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना सादर करेल. हा जमा होणारा निधी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून SEIAA व SEAC समित्यांचे सचिवालय म्हणून करण्यात येणा-या खर्चास पूरक निधी म्हणून असेल.

(४) या जमा शुल्कातून सर्वसाधारणपणे खालील खर्च भागविण्यात यावा :-

अ) SEIAA व SEAC समित्यांचे अध्यक्ष, सदस्य यांचा बैठक भत्ता, बैठकीची व्यवस्था, बैठक कक्ष, सचिव व सदस्य सचिव यांचा प्रवास, बैठकी दरम्यान निवास, वाहन, स्थळ पाहणी इत्यादीवरील खर्च.

ब) SEIAA व SEAC समित्यांसाठी पर्यावरण विभागास लागणारा आस्थापनेवरील खर्च, जसे संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, झेरॉक्स, स्कॅनर, सॉफ्टवेअर, हार्डवेअर, नवीन वाहने व इंधन इत्यादी खरेदी, दुरुस्ती, प्रशिक्षण, संकेतस्थळ अद्ययावत/देखभाल करणे, नस्ती व्यवस्थापन यावर होणारा अनुषंगिक खर्च. याबाबत खरेदी व त्यावरील खर्चाचे निर्देश मंडळाला विभागाद्वारे आवश्यकतेनुसार देण्यात येतील.

क) समित्यांच्या कामासाठी बाह्य स्त्रोतांपरील कर्मचारी जसे ऑफिस बॉय, चालक, लघुलेखक, विधी अधिकारी, तांत्रिक सहायक इत्यादींवरील मासिक महेनतानाचा खर्च, कर्मचाऱ्यांच्या ठोक नियुक्तीबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला विभागाकडून नामनिर्देशने पाठविण्यात येतील.

ड) या संबंधातील न्यायालयीन प्रकरणे, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाशी संबंधित प्रकरणे, केंद्र शासनाकडील यासंबंधीच्या बैठका, याअनुषंगाने पर्यावरण विभागातील कामे, सदस्य सचिव, समिती सचिव, सचिव, संचालक, प्रधान सचिव इत्यांदींनी केलेल्या रेल्वे व विमान प्रवासाचा खर्च, प्रधान सचिव, संचालक यांचे वाहन, इंधन व त्यावरील अनुषंगीक खर्च, न्यायिक सल्ल्यासाठी होणारा खर्च, तक्रारींवरील सुनावणी, स्थळ पाहणी, बैठका, माहिती अधिकार, वकिलांची प्रकरणनिहाय नियुक्ती इत्यादींवरील खर्च.

इ) SEIAA व SEAC प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी ई-गव्हर्नन्स व तत्सम बाबींवर होणारा खर्च. तसेच विभागाने निर्देशीत केल्यानुसार संबधीत आकस्मीक कामे इ. वरील खर्च.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९८/१४ व्यय-१६, दि.१३.३.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५०६१५०५३१८१०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Devidas Kerbaji Mankar

Digitally signed by Devidas Kerbaji Mankar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=ENVIRONMENT DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Devidas Kerbaji Mankar
Date: 2014.05.06 15:16:47 +05'30'

(दे. के. मानकर)

शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव

३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव

४. सर्व मंत्री / सर्व राज्यमंत्री

५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

६. सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, महाराष्ट्र शासन

७. सर्व विभागीय आयुक्त

८. सर्व जिल्हाधिकारी

९. सर्व महानगरपालिका आयुक्त

१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई

११. सर्व SEAC समित्या व SEIAA प्राधिकरण/रोख शाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.

# महाराष्ट्र शासन

क्रमांक-संकीर्ण २०१३/प्र.क्र.१५१/तां.क.१,
पर्यावरण विभाग, १५ वा मजला,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालय,
मुंबई-४०००३२.
दिनांक - १२ जुन, २०१४.

कार्यालयीन आदेश

विषय : पूर्व पर्यावरण अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांवर छाननी शुल्क आकारण्याबाबत ..
संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण २०१३/प्र.क्र.१५१/तां.क.१,
दिनांक २ मे, २०१४.
२) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र.संकाआ-१५३३(अ),
दिनांक १४.९.२००६.

उपरोक्त केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना आणि शासन निर्णय दि.२ मे, २०१४ नुसार पूर्व पर्यावरण अनुमतीसाठी प्राप्त प्रस्तावांवर खालीलप्रमाणे छाननी शुल्क आकारण्यात येईल :-

| अ.क्र. | प्रकल्पाची एकूण किंमती | छाननी शुल्क |
|---|---|---|
| १ | रु.१ कोटी ते रु.५० कोटीपर्यंत | रु.१ लक्ष |
| २ | रु.५० कोटी ते रु.१०० कोटीपर्यंत | रु.३ लक्ष |
| ३ | रु.१०० कोटी ते रु.५०० कोटीपर्यंत | रु.५ लक्ष |
| ४ | रु.५०० कोटी ते १००० कोटीपर्यंत | रु.१० लक्ष |
| ५ | रु.१००० कोटी व अधिक | रु.२५ लक्ष |

सर्व संबंधित प्रकल्प प्रवर्तक यांनी वर नमुद केलेल्या निकषानुसार SEAC ने प्रकल्पाची शिफारस केल्यानंतर खाली नमूद केलेल्या बँक खात्यामध्ये चलनाद्वारे छाननी शुल्क जमा करुन चलनाची मुळ प्रत प्रकल्पाच्या तपशीलासह SEIAA कडे बैठकीपूर्वी सादर करावी.

| | | |
|---|---|---|
| Name of A/C | : | SEIAA/SEAC Secretariat. |
| Current A/C No. | : | 33876812558 |
| Name of Bank | : | STATE BANK OF INDIA<br>MATUNGA BRANCH (CODE NO.05350)<br>76-A, Rafi Ahmed Kidwai Road, Mumbai-400019 |
| IFS Code No. | : | SBIN0005350 |
| MICR No. | : | 40000 2056 |

पूर्व पर्यावरणीय अनुमतीसाठी जे प्रकल्प SEIAA कडे छाननीसाठी प्राप्त होतील त्या प्रकल्पांनी छाननी शुल्क अदा केल्याची खात्री केल्यानंतरच असे प्रकल्प SEIAA च्या बैठकीपुढे विचारार्थ ठेवण्यात यावेत. तसेच SEIAA ने ज्या प्रकल्पांची आतापर्यंत छाननी पूर्ण झाली आहे परंतु पर्यावरणीय अनुमती अद्याप निर्गमित करण्यात आलेली नाही अशा प्रकल्पांनीसुध्दा वरीलप्रमाणे छाननी शुल्क अदा केल्याशिवाय त्यांना पर्यावरणीय अनुमती निर्गमित करु नये.

वरीलप्रमाणे जमा होणाऱ्या छाननी शुल्काबाबतचे अभिलेख SEIAA आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी ठेवावेत.

(सो.ना.बागुल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल, महाराष्ट्र यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, महाराष्ट्र शासन
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
सर्व SEAC समित्या व SEIAA प्राधिकरण,
रोख शाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.

## Procedure for scrutiny fee

- All Project Proponents/Consultants please note to deposit scrutiny fees as per Government Resolution dated 2nd May, 2014 & Office order dated 12th June, 2014. Account number and other details are given in the office order dated 12th June 2014. If any doubts regarding mode of payment & receipt, you may contact Chief Accountant Officer, MPCB (Shri. Patil- 022 240240612). Please note that Project Proponent/authorized person has to submit the receipt of the scrutiny fee paid in the said account along with letter in the following format-

- Name of the project.
- Name of Project Proponent
- Name of the consultant
- SEAC(I/II/III) meeting number
- Item number in the Agenda of SEAC
- Scrutiny fee details
  a) Amount deposited
  b) Date of deposition
  c) Total cost of the project
  d) Date of fee deposited

# Procedure for scrutiny fee

- All Project Proponents/Consultants please note to deposit scrutiny fees as per Government Resolution dated 2nd May, 2014 & Office order dated 12th June, 2014. Account number and other details are given in the office order dated 12th June 2014. One has to submit Demand Draft of applicable amount along with letter in the following format to SEIAA cell -

- Name of the project.
- Name of Project Proponent
- Name of the consultant
- SEAC(I/II/III) meeting number
- Item number in the Agenda of SEAC
- Scrutiny fee details
  a) Amount deposited
  b) Date of deposition
  c) DD details
  d) Total cost of the project
  e) Date of fee deposited

(plz ignore earlier post in this matter )